**व्याख्यान** • माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे के. के. वाघ शिक्षण संस्थेत विचार

# धार्मिक ध्रुवीकरण अन् अस्थिरतेने २७०० विदेशी कंपन्या भारताबाहेर

## २७ लाख कोटींचे कर्ज एकूण जीडीपीच्या ८६ टक्के इतके

देशातील १० हजार ७५६ विदेशी उद्योगांपैकी तब्बल २७०० कंपन्यांनी भारतातून काढता पाय घेतला आहे. यातून बेरोजगारीचा धोका अधिक वाढला आहे. देशात दारिद्र्य, उपासमार व अप्रत्यक्ष बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे भारतातील लोकांच्या राहणीमानावर त्याचा परिणाम होतो. या तुलनेत चीनची अर्थव्यवस्था भारताच्या पाच पट मोठी असून भारत चीनची बरोबरी कधीच करू शकणार नाही. देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केंद्र सरकारने २७ लाख कोटींचे कर्ज घेतले आहे. जे भारताच्या एकूण जीडीपीच्या ८६ टक्के इतके आहे. कर्ज घेतल्याचा परिणाम होत नाही; पण त्यालाही मर्यादा आहेत. म्हणून उत्पन्न वाढीसाठी करवाढ व शासकीय कंपन्यांची विक्री केली जात आहे. दुसरीकडे धार्मिक ध्रुवीकरणामुळे लोकशाहीला धोका संभवतो. त्यामुळे लोकशाही जिवंत राहील का? असा धोकाही चव्हाण यांनी व्यक्त केला.



**प्रतिनिधी** | नाशिक

देशात सद्यपरिस्थितीत उद्योगांना पोषक वातावरण उपलब्ध होत नाही. जातीय व धार्मिक ध्रुवीकरण वाढल्याने तसेच राजकीय धोरणांच्या अस्थिरतेचा सर्वाधिक फटका उद्योगांना बसला असून देशातून तब्बल २७०० विदेशी कंपन्यांनी भारतातून आपला गाशा गुंडाळला आहे. नवीन उद्योग येत नाही. आहे ते उद्योग भारताबाहेर जात असल्याने देशात बेरोजगारीनेही उच्चांक गाठला आहे. त्यामुळे देशातील सद्यस्थितीचा फटका उद्योग क्षेत्राला बसल्याने रोजगार निर्मितीवर मोठा परिणाम झाल्याचे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले. देशात महागाई वाढत असल्याने श्रीलंका व पाकिस्तान या देशांसारखी परिस्थिती उद्भवू शकते, त्यामुळे सरकारने योग्य ती पावले उचलावीत असेही ते म्हणाले.

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे शुक्रवार (दि. ३) जून रोजी गंगापूर रोडवरील कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृहात व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी 'भारतीय अर्थव्यवस्था आणि भारतीय शिक्षण पद्धतीसमोरील भविष्यातील आव्हाने' या विषयावर आपले मत व्यक्त केले. माजी खासदार प्रतापराव वाघ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी मुख्यमंत्री चव्हाण यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा लेखाजोखा सहज, साध्या, सोप्या शब्दांत मांडला. ते म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था २.७ ट्रिलियन डॉलर इतकी आहे. मार्च २०२३ ही अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर इतकी करण्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले होते. परंतु, सद्यस्थितीचा ज विकासदर बघता हे शक्य होणार नाही. त्यामुळे केंद्र सरकारने आता ५ ट्रिलियनची अर्थव्यवस्थेचा मुद्दा सोडून दिला आहे. १३० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोक शेती क्षेत्रात काम करतात. 'जीडीपी'मध्ये त्यांचा वाटा १५ टक्के आहे तर, सेवा क्षेत्राचा ५४ टक्के आणि उर्वरित उद्योगांचा वाटा आहे. देशाचा 'जीडीपी' सातत्याने घसरत असल्याने दरडोई दरमानसी उत्पन्नात जगात भारताचा १४२ वा क्रमांक लागतो. जो बांगलादेशापेक्षाही खाली असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव के. एस. बंदी, अजिंक्य वाघ आदी उपस्थित होते. व्याख्यानास नागरिक तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

Divya Marathi 04-06-2022

लोकमत

# 'डेमोक्रॅटिक ऑटोक्रसी'मुळे देशाचे होतेय नुकसान : चव्हाण

## धार्मिक ध्रुवीकरणामुळेही विदेशी कंपन्या गुंतवणुकीस अनुत्सुक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : भारतात स्वातंत्र्यापासून लिबरल डेमोक्रसी अर्थात खुल्या विचारांची लोकशाही असल्याचे जगाला अवगत होते. मात्र, सध्याचे केंद्र शासन ही 'डेमोक्रॅटिक ऑटोक्रसी' अर्थात निवडून आलेली हुकूमशाही असल्याची भावना जगातील देशांमध्ये आहे. त्यामुळे तसेच धार्मिक ध्रुवीकरणाच्या वातावरणामुळेही विदेशी कंपन्या गुंतवणुकीस अनुत्सुक असल्याने देशाचे आणि पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रचंड नुकसान होत असल्याचे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले.

के.के.वाघ संस्थेच्यावतीने कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृतिप्रीत्यर्थ 'भारतीय अर्थव्यवस्था आणि शिक्षण पद्धतीसमोरील आव्हाने' या विषयावर ७३ वे विचारपुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी खासदार डॉ. प्रताप वाघ उपस्थित होते. यावेळी बोलताना आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात कमी खर्च करण्याकडे सर्वच सरकारांचा कल असतो, असे चव्हाण यांनी सांगितले. भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील पाचव्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था असली तरी दरडोई उत्पन्नात आपण बांगलादेशपेक्षाही खाली १४२ व्या क्रमांकावर आहोत. आपल्या देशाचा आर्थिक विकासाचा दर कोरोनापूर्वीपासूनच खालावत असून कोरोनापूर्वीच तो अवघ्या ४ टक्क्यांवर गेला होता. केंद्र शासनाच्या धोरणांमुळे २०१४ पासून देशातील २,७०० परकीय कंपन्यांनी भारतातील उद्योग व्यवसाय बंद केले आहेत. त्याचा परिणाम एकूणच उद्योगांमध्ये नवीन गुंतवणूक करण्यास विदेशातील कंपन्या फारशा तयार नसल्याचे दिसून येत आहे, असे चव्हाण यांनी सांगितले. शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल झाले तरच नवीन आव्हानांचा मुकाबला करण्यास नवीन पिढी सक्षम होऊ शकणार आहे. या शिक्षणात मातृभाषा आणि भारतीय भाषा आवश्यकच आहेत. मात्र, इंग्रजी ही ज्ञानभाषा असल्याने तिला दुर्लक्षून चालणार नाही. सध्या शिक्षण क्षेत्रात मल्टिडिसिप्लिनरी प्रशिक्षण घेणे हीच काळाची गरज आहे. प्रत्येकाने आवड जोपासत, संभाषण कौशल्य आणि सामान्य ज्ञान वाढवत आपल्या शाखेतील शिक्षण घेण्यावर भर द्यावा, असेही चव्हाण यांनी येथे नमूद केले. माजी खासदार प्रताप वाघ यांनी प्रास्ताविक केले.

### १९६०-७० च्या दशकातील निर्णयाचा फटका



स्वातंत्र्योत्तर काळात कोणत्याही विदेशी कंपनीची १०० टक्के गुंतवणूक नको, असे भारताचे धोरण होते. १९६० ते ७० च्या दशकात अमेरिकेतील सेमीकंडक्टर बनविणाऱ्या कंपन्या भारतात येण्यास उत्सुक होत्या. त्या सेमीकंडक्टरचा उपयोग सध्याच्या जगातील प्रत्येक इलेक्ट्रॉनिक वस्तूत होतो. मात्र त्यावेळी आपल्या धोरणकर्त्यांनी संबंधित कंपन्यांना नकार दिला. आता आपण सेमीकंडक्टर बनवू इच्छिणाऱ्या कंपन्यांना हजारो कोटी अनुदान देऊन बोलावतोय तरी ते येत नाहीत. त्यावेळी झालेल्या धोरणात्मक चुकीचे परिणाम नंतर भोगावे लागतात. पण, प्रगतीच्या दिशेची 'वुई मिस्ड द बस' हे वास्तव असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आपलं महानगर | My महानगर.com

## अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी केंद्रासमोर तीनच पर्याय

# कर्ज काढा, कर वाढवा नाहीतर शासकीय कंपन्या विका

### पृथ्वीराज चव्हाण : के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे स्मृती व्याख्यानमाला

**नाशिक** । भारतात धार्मिक व जातीय ध्रुविकरण वाढल्याने देशात नवीन उद्योग येण्यासाठी तयार नाहीत. त्यातच देशातील १० हजार ७५६ विदेशी उद्योगांपैकी तब्बल २७०० कंपन्यांनी भारतातून काढता पाय घेतला आहे. यातून बेरोजगारीचा धोका अधिक वाढला असून, राजकीय धोरणांच्या अस्थिरतेचा उद्योगधंद्यांना सर्वाधिक फटका बसल्याची चिंता माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी येथे व्यक्त केली.

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रित्यर्थ के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे शुक्रवारी (दि.३) गंगापूर रोडवरील कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'भारतीय अर्थव्यवस्था आणि भारतीय शिक्षण पध्दती समोरील भविष्यातील आव्हाने' या विषयावर त्यांनी विचार व्यक्त केले. माजी खासदार प्रतापराव वाघ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी मुख्यमंत्री चव्हाण यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा लेखाजोखा साध्या, सोप्या शब्दात मांडला. ते म्हणाले, देशाची अर्थव्यवस्था २.७ ट्रिलियन डॉलर इतकी आहे. मार्च २०२३ ही अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर





इतकी करण्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले होते. परंतु, आताचा विकासदर पाहता ते अशक्य आहे. त्यामुळे केंद्र सरकारने आता ५ ट्रिलियनच्या अर्थव्यवस्थेचा मुद्दा सोडून दिला आहे. १४० कोटी लोकसंख्येच्या भारतात ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोक शेती करतात. 'जीडीपी'मध्ये त्यांचा वाटा १६ टक्के तर, सेवा क्षेत्राचा ५४ टक्के व उर्वरित उद्योगांचा वाटा आहे. देशाचा 'जीडीपी' सातत्याने घसरत असल्याने दरडोई दरमानसी उत्पन्नात जगात भारताचा १४२ वा क्रमांक लागतो. जो बांगलादेशपेक्षाही खाली आहे.

चीनची अर्थव्यवस्था भारताच्या पाच पट मोठी असून भारत आता चीनची बरोबरी कधीच करू शकणार नाही. देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केंद्र सरकारने २७ लाख कोटींचे कर्ज घेतले आहे. जे भारताच्या एकूण जीडीपीच्या ८६ टक्के इतके आहे. कर्ज घेतल्याचा परिणाम होत नाही; पण त्यालाही मर्यादा आहेत. म्हणून उत्पन्न वाढीसाठी करवाढ व शासकीय कंपन्यांची विक्री केली जात आहे. धार्मिक ध्रुविकरणामुळे उदारमतवादी लोकशाहीला धोका संभवतो. निवडून दिलेली हुकुमशाही अशी मोदी सरकारची प्रतिमा होत असल्याने देशात लोकशाही जीवंत राहिल का? असा धोकाही माजी मुख्यमंत्री चव्हाण यांनी व्यक्त केला. विद्यार्थी व प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली. माजी खासदार प्रतापराव वाघ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव के. एस. बंदी, अजिंक्य वाघ आदी उपस्थित होते.

AaplaMahanagar Edition
Jun 4, 2022 Page No. 9
Powered by : eReleGo.com

# कर्ज काढा, कर वाढवा धोरणानंतरही अर्थव्यवस्था अडचणीत : चव्हाण

**नाशिक । दि. ३ प्रतिनिधी**

कर्ज काढा, कर वाढवा या धोरणानंतरही अर्थव्यवस्था आटोक्यात येत नसल्याने सरकारने सार्वजनिक उपक्रम विकण्यास सुरुवात केली आहे. घरात अगदी शेवटचा पर्याय म्हणून गृहिणीचे मंगळसूत्र विकले जाते. त्याच पद्धतीने या सरकारची अवस्था होऊन सरकारी उपक्रम विकले जात असल्याची खरमरीत टीका माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज येथे केली.

कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या ७३ व्या स्मृतिदिनानिमित्त के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे रावसाहेब थोरात सभागृहात भारतीय अर्थव्यवस्था आणि शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने या विषयावर पृथ्वीराज चव्हाण यांचे व्याख्यान झाले. यावेळी माजी खासदार प्रतापराव वाघ अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी स्वागत केले.



पृथ्वीराज चव्हाण यांनी भाषणाच्या पहिल्या भागात भारतीय अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केले. सध्याचा विचार करता भारताची स्थिती श्रीलंका व पाकिस्तानच्या दिशेने वाटचाल सुरू आहे की काय, असे अनेक तज्ज्ञांना वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी

## के. के. वाघ स्मृती व्याख्यान

त्यांनी २०१४ नंतर भारतातील २७०० परकीय उद्योग देशाबाहेर गेले असल्याचे सांगून मेक इन इंडिया ही योजनाही अपयशी झाल्याचा आरोप केला. या योजनेतून उत्पादन क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील वाटा १६ वरून २५ टक्के करण्याचे उद्दिष्ट होते, प्रत्यक्षात तो वाटा १३ टक्के झाल्याची टीका त्यांनी केली. मागील काही वर्षांमध्ये उद्योग, व्यवसाय सोडून अडीच कोटी लोक पुन्हा शेतीत आले आहेत, ही चांगली बाब नसल्याचेही त्यांनी सांगितले.

नवीन शैक्षणिक धोरणात अतिउत्साहामध्ये मातृभाषेतून इंजिनिअरिंग व वैद्यकीय शिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे. यामुळे केवळ मातृभाषेचा आग्रह चुकीचा आहे. इंग्रजीशी नाळ तोडल्यास त्याचे दुष्परिणाम पुढच्या दोन पिढ्यांना भोगावे लागतील, असा इशारा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सरकारला दिला.

यावेळी शकुंतला वाघ, के. एस. बंदी, प्राचार्य पी. टी. कडवे, आर. डी. अमृतकर, आर. ए. हारळे, सुनील कुटे, राजाराम पानगव्हाणे, शोभा बच्छाव, डॉ. हेमलता पाटील आदींसह वाघ परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# गुणवत्तापूर्ण शिक्षण ठरेल तारक

**नाशिक :** अन्य देशांच्या तुलनेत आर्थिक विकास आणि तंत्रज्ञान या दोन्ही बाबींमध्ये आपण पिछाडीवर आहोत. येणाऱ्या काळात हे चित्र बदलणे गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणच आपल्या देशाला तारेल, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शुक्रवारी केले.

के. के. वाघ फार्मसी आणि पॉलिटेक्निक कॉलेजमार्फत रावसाहेब थोरात सभागृहामध्ये आयोजित काकासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. चव्हाण म्हणाले, की तंत्रज्ञानातील प्रगती बेरोजगारी वाढविते हे वास्तव आहे. परंतु, त्यावर उपाय म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण. तंत्रज्ञानामध्ये आपण प्रचंड पाठीमागे आहोत. चीनने नुकतेच हायपरसॉनिक क्षेपणास्त्र सोडून अमेरिकेला धक्का दिला आहे. चीनने केलेली प्रगती त्यांच्या शिक्षण आणि आर्थिक धोरणांचे द्योतक आहे. त्यामुळे आपल्या शिक्षणपद्धतीचा आणि धोरणांचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणच आपल्याला या परिस्थितीतून बाहेर काढू शकते. शिक्षणात मातृभाषेचा अतिरेक नसावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.




## देशाची प्रतिमा बदलली

सध्या देशामध्ये जे धार्मिक ध्रुवीकरण झाले आहे, त्यामुळे देशाची प्रतिमा बदलली आहे. निवडून आलेली एकाधिकारशाही, अशी जगभरात भारताची ओळख बनत चालली आहे. यामुळे आपल्या देशात रुजलेली उदारमतवादी लोकशाही उरणार नाही, अशी खंतही चव्हाण यांनी व्यक्त केली.

आर्थिक विकासाबाबत चव्हाण म्हणाले, की गेल्या दहा वर्षांत देशाचा खालावलेला आर्थिक विकासदर, वाढती महागाई, कर आदी या गोष्टी लक्षात घेता आपला देश विकासाच्या दिशेने चालला आहे की नाही हे लगेच लक्षात येईल. जगातली पाचवी मोठी अर्थव्यवस्था भारताची आहे. क्रयशक्तीआधारे आपल्या अर्थव्यवस्थेचा तिसरा क्रमांक लागतो. पण, दरडोई जीडीपीचा विचार करता आपण १४२ व्या स्थानी आहोत. बांगलादेशासारखा लहान देशही आपल्या पुढे गेला आहे. मोदी सरकारने २०२३ पर्यंत आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार पाच ट्रिलियन डॉलर करण्याची घोषणा केली होती. परंतु, आज हा आकार २.७ ट्रिलियन डॉलर आहे. 'मेक इन इंडिया'सारख्या घोषणा करूनही १६ टक्के असणारा आपला उत्पन्नाचा दर १३ टक्क्यांवर आला आहे. आर्थिक तोल सावरण्यासाठी कोणतेही सरकार तीन पर्याय वापरते. कर्ज घेणे, कर वाढविणे आणि शेवटी सरकारी कंपन्या विकणे. पहिले दोन्ही पर्याय वापरून आता सरकार तिसऱ्या पर्यायाकडे वळले आहे.

अध्यक्षस्थानी असलेले माजी खासदार डॉ. प्रतापराव वाघ यांनी कौशल्याधारित शिक्षण गरजेचे असल्याचे मत मांडले. 'विचारवेध' पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, प्रा. पी. टी. कडवे, 'शब्दमल्हार'चे प्रकाशक स्वानंद बेदरकर आदी उपस्थित होते.

# मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह चुकीचा

## ■ पृथ्वीराज चव्हाण : के. के. वाघ स्मृती व्याख्यानात प्रतिपादन

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरणात अतिउत्साहामध्ये मातृभाषेतून इंजिनिअरिंग व वैद्यकीय शिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे, त्यामुळे केवळ मातृभाषेचा आग्रह चुकीचा आहे. इंग्रजीशी नाळ तोडल्यास त्याचे दुष्परिणाम पुढच्या दोन पिढ्यांना भोगावे लागतील, असा इशारा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सरकारला दिला आहे.

कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या ७३ व्या स्मृतिदिनानिमित्त के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे रावसाहेब थोरात सभागृहात 'भारतीय अर्थव्यवस्था आणि शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने' या विषयावर पृथ्वीराज चव्हाण यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी माजी खासदार प्रतापराव वाघ होते.

पृथ्वीराज चव्हाण यांनी भाषणाच्या पहिल्या भागात भारतीय अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केले. सध्याचा विचार करता, भारताची स्थिती श्रीलंका व पाकिस्तानच्या दिशेने वाटचाल सुरू आहे की काय, असे अनेक तज्ज्ञांना वाटत



असल्याचे त्यांनी सांगितले. कर्ज काढा, कर वाढवा या धोरणानंतरही अर्थव्यवस्था आटोक्यात येत नसल्याने, सरकारने सार्वजनिक उपक्रम विकण्यास सुरुवात केली आहे. घरात अगदी शेवटचा पर्याय म्हणून गृहिणीचे मंगळसूत्र विकले जाते. त्याच पद्धतीने या सरकारची अवस्था होऊन सरकारी उपक्रम विकले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी २०१४ नंतर भारतातील २७०० परकीय उद्योग देशाबाहेर गेले असल्याचे सांगून, 'मेक इन इंडिया' ही योजनाही अपयशी झाल्याचा आरोप केला. भारतीय अर्थव्यवस्थेवरील चर्चेनंतर पृथ्वीराज चव्हाण यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबाबतची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्राधान्य दिले ही चांगली बाब आहे. मात्र, मातृभाषेतून इंजिनिअरिंग व वैद्यकीय शिक्षण देण्यामुळे इंग्रजीपासून नाळ तुटण्याची शक्यता असून, त्यामुळे पुढील दोन पिढ्यांचे नुकसान होईल, असा इशारा त्यांनी दिला. यासाठी त्यांनी बाळासाहेब खेर यांनी महाराष्ट्रात इंग्रजी हा विषय आठवीपासून सुरू करण्याचा निर्णय घेतल्याने मोठे नुकसान झाल्याचे उदाहरण दिले.

Nashik Edition
Jun 4, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in





नाशिक: पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमालेत शुक्रवारी विचारवेध पुस्तकाचे प्रकाशन करताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण. शेजारी माजी खासदार डॉ. प्रतापराव वाघ, अजिंक्य वाघ, स्वानंद बेदरकर. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थितांमध्ये शकुंतला वाघ, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ आणि इतर.

# शिक्षण खासगी क्षेत्राकडे सोपवणे चुकीचे

## पृथ्वीराज चव्हाण : काकासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमाला

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ३ : प्राथमिकपासून उच्च शिक्षणाची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्राने घ्यायला हवी, अशी आग्रही भूमिका मांडताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केंद्र आणि राज्य सरकार शिक्षणासह आरोग्यमधून अंग काढून घेऊन खासगी क्षेत्रांकडे सोपवत आहे, हे चुकीचे आहे, असे अधोरेखित केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमालेचे ७३ वे पुष्प श्री. चव्हाण यांनी शुक्रवारी (ता. ३) गुंफले.

रावसाहेब थोरात सभागृहात के. के. वाघ तंत्रनिकेतन, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि फार्मसी संस्थेतर्फे झालेल्या कार्यक्रमात श्री. चव्हाण 'भारतीय अर्थव्यवस्था आणि शिक्षण पद्धतीसमोरील भविष्यातील आव्हाने' या विषयावर बोलत होते. माजी खासदार डॉ. प्रतापराव वाघ अध्यक्षस्थानी होते. विनाअनुदानित व्यवस्थापन संस्थांच्या अध्यक्षपदी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा श्री. चव्हाण यांच्या हस्ते सत्कार झाला. तसेच व्याख्यानमालेतील ७२ व्याख्यानांच्या 'विचारवेध' पुस्तकाचे प्रकाशन श्री. चव्हाण यांच्या हस्ते झाले. अजिंक्य वाघ, पुस्तकाचे संपादक स्वानंद बेदरकर उपस्थित होते. विश्वस्त शकुंतला वाघ, चांगदेवराव होळकर, डॉ. के. एन. नांदूरकर, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य प्रकाश कडवे, आर. डी. अमृतकर, आर. ए. हिरोळे आदी उपस्थित होते. शिक्षणाचे व्यापारीकरण सुरू असताना, के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात असून, (कै.) बाळासाहेब वाघ यांनी मोठे शिक्षण संकुल उभारल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले. शिक्षण व्यवस्थेत आपण बदल केला नाही,' तर देशापुढील आव्हाने वाढतील आणि सार्वभौम लोकशाही टिकण्याबद्दल प्रश्नचिन्ह तयार होईल, अशीही शंका त्यांनी उपस्थित केली.

### दरडोई उत्पन्नात बांगलादेश पुढे

जगातील सगळ्यात मोठ्या अर्थव्यवस्थेत भारताचा पाचवा, क्रयशक्तीच्या आधारे तिसरा क्रमांक लागत असला, तरीही दरडोई उत्पन्नात देशाचा १४२ वा क्रमांक लागत असून, बांगलादेश आपल्यापुढे आहे. अशा पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेचा विकास गतीने व्हायला हवा. दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी, शाश्वत रोजगाराचा अभाव संपुष्टात यायला हवा, असे सांगून श्री. चव्हाण म्हणाले, की अर्थव्यवस्थेचा विकासदर कोरोनापूर्वी घसरत जाऊन ४.२ टक्क्यांपर्यंत पोचला होता. त्यातच कोरोनाने अर्थव्यवस्था, विकास दर उंचावण्याची अनिश्चितता वाढवली. पंतप्रधानांनी मार्च २०२३ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलीयन डॉलर्स करण्याचे आश्वासन दिले होते. आता मात्र मुदत न सांगता पुन्हा आश्वासन तेच दिले जात आहे. त्यामुळे कधी ना कधी तरी आपल्या देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलीयन डॉलर्सला पोचणार आहे. मात्र, त्यासाठी अर्थव्यवस्था विकास दर दहा टक्क्यांपर्यंत न्यावा लागेल. चीनने आर्थिक सुधारणांना सुरवात केल्यावर २० वर्षे विकास दर दहा टक्क्यांपर्यंत ठेवल्याने चीनची अर्थव्यवस्था भारतापेक्षा पाच पट मोठी झाली.

### अमेरिकन सैन्यप्रमुखांकडून स्फुटनिकचा उल्लेख

चीनने वेगवान गतीने झेपावणारे क्षेपणास्त्र 'लॉंच' केल्यावर अमेरिकन सैन्य प्रमुखांनी स्फुटनिकविषयक वक्तव्य केले. अर्थात, त्यामागे रशियाने सोडलेल्या स्फुटनिक उपग्रहानंतर तंत्रज्ञानविषयक प्रगती करून अमेरिकेने रशियाला मागे टाकल्याचा संदर्भ होता. तंत्रज्ञानाबाबत चीनने अमेरिकेला मागे टाकले आहे. ही सारी परिस्थिती पाहता, पुढील युद्ध क्षेपणास्त्र उडविणाऱ्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून होईल इतके तंत्रज्ञान विकसित झाले आहे. जागतिक या परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर प्रात्यक्षिकांद्वारे मनुष्यबळ कौशल्याधिष्ठित करण्याचे उपक्रम देशात राबवावे लागतील. 'मल्टी डिसीप्लिनरी ट्रेनिंग' हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. शिक्षणापलिकडे जाऊन प्रत्येक तरुणाला छंद आणि कलेत पारंगत व्हावे लागेल. सामान्यज्ञान आत्मसात करावे लागेल. संवाद कौशल्य अवगत करत आयुष्यभर विद्यार्थी राहावे लागेल, असेही श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले. आपल्या पूर्वजांनी ज्यांच्यासाठी शाळा-महाविद्यालये सुरु केली आहेत, त्या सामान्य माणसासाठी शिक्षण प्रगतीचा विचार करावा लागेल, असे सांगून डॉ. वाघ म्हणाले, की पाचवीपासून तंत्रविषयक कार्यशाळा सुरू कराव्या लागतील. कमी कालावधीचे अभ्यासक्रम सुरू करावे लागतील. त्यातून भावी पिढी आत्मनिर्भर होऊन बेरोजगारीचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.

**पृथ्वीराज चव्हाण म्हणालेत :**

- लोकसंख्या विस्फोटात आपण चीनला मागे टाकणार आहोत. त्यामुळे शेतीत प्रगती करावी लागेल
- अर्थव्यवस्थेच्या ८६ टक्के कर्ज केंद्र सरकारने घेतले आहे. जपानचे २१५ आणि अमेरिकेचे १५० टक्के कर्ज असले, तरीही आणखी आपण कर्ज घेत राहिल्यास सापळ्यात देश अडकेल
- कर वाढवणे हा दुसरा मार्ग सरकार अवलंबते. गेल्या आठ वर्षांत केंद्र सरकारने २७ लाख कोटी इंधनाच्या करापोटी जमा केले.
- श्रीलंकेतील असंतोष आणि पाकिस्तानमधील सत्तांतराच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेचे प्रश्न तयार झाल्यावर केंद्राने दुरुस्तीला सुरवात केली
- कर्ज घेणे, करवाढीनंतर सरकारी कंपन्या विकण्याचा सपाटा केंद्र सरकारने लावला आहे. देशात सार्वजनिक क्षेत्रातील २५० उपक्रम आहेत
- २०१४ ते २०२१ पर्यंत देशात १० हजार ७५६ परकीय उद्योग होते. २०१४ नंतर २ हजार ७०० कंपन्या देशातील कारभार गुंडाळून गेल्या आहेत
- निवडून आलेल्यांची अधिकारशाही असे मूल्यांकन आपल्या देशाच्या लोकशाहीचे आता होऊ लागले आहे
- धार्मिक ध्रुवीकरणामुळे असहिष्णुतेच्या दिशेने देशाची सुरू झालेली वाटचाल परदेशी कंपन्यांनी देशातील गाशा गुंडाळण्यामागील कारणांपैकी एक आहे
- 'मेक इन इंडिया' ठरले अपयशी. अर्थव्यवस्थेतील उत्पादन क्षेत्राचा वाटा १६ टक्क्यांवरून २५ टक्के, विकास दर १२ टक्के, १० कोटी नवीन रोजगारनिर्मिती करणे ही उद्दिष्टे होती, पण उत्पादन क्षेत्राचा वाटा १३ टक्क्यांपर्यंत घसरला आणि उद्योग-धंद्याकडून अडीच लाख लोक शेतीकडे वळाले
- नवीन तंत्रज्ञानामुळे रोजगारावर परिणाम झाला असताना, नवीन नोकऱ्या गुणवत्ताधारक-कौशल्याधिष्ठित मनुष्यबळाला मिळतील
- मातृभाषेतून शिक्षण घ्यायला हवे. मात्र, इंग्रजी ही ज्ञानभाषा सोडून चालणार नाही. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्याचा अतिउत्साह केल्यास पिढीवर अन्याय होईल